महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/ २६ /२०२४ दि. २९/०२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीतील शिव मंदिर समोरील हेलीपॅड मैदान अंबरनाथ येथे दिनांक २९/०२/२०२४ रोजी ते दिनाक ०३/०३/२०२४ रोजी पावतो शिवमंदिर आर्ट फेस्टीव्हल २०२४ साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम करिता व्ही.आय.पी. व वेगवेगळया कला क्षेत्रातील प्रसिद्ध कलाकार, गायक, सिनेकलाकार तसेच मोठया प्रमाणात जनसमूदाय उपस्थित राहणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) हिंदू स्मशानभूमीकडून गोविंद तीर्थ पुलपर्यंत जाणारी एक वाहिनी सर्व प्रकारच्या वाहनांना **हिंदू स्मशानभूमी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने गोविंद तीर्थ कडून हिंदू स्मशानभूमी कडे येणा–या मार्गावरून दोन्ही बाजुची वाहने ये जा करतील तसेच पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) रिलायंन्स मार्ट कडून शिवमंदिर कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **रिलायंन्स मार्ट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने रिलायंन्स मार्ट येथून कैलास कॉलनी मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) शिवमंदिर कडून रिलायन्स मार्ट कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना शिवमंदिर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दिनांक २९/०२/२०२४ रोजी ते दिनांक ०३/०३/२०२४ रोजी वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.**

CamScanner